नियमित दिवाणी दावा क्रमांक १०२/२००८ मधील नि. ४१ खालील आदेश

वादीचा दुरुस्ती अर्ज व त्यावरील प्रतिवादीचे म्हणणे विचारात घेता खालील मुद्‌दे माझे पुढे निर्णयासाठी आलेले असून त्यावर कारणमिमांसा देवून खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

| | मुद्‌दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीचे दुरुस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुप पुर्णत: बदलत आहे काय ? | नकारार्थी |
| २ | अंतिम आदेश काय ? | खालीलप्रमाणे |

## कारणमिमांसा

२. दोन्ही पक्षांचे प्रतिपादन ऐकले. वादी तर्फे प्रतिपादन करणेत आले की, दावा प्रलंबित असताना कोर्ट कमिशनर मार्फत दिनांक २४/६/२०१० रोजी मोजणी झाली असून त्याचा नकाशा दाव्यात दाखल केला आहे. सदर नकाशाचे वादीने अवलोकन करता प्रतिवादीने वादीचे जमिनीत २९ आर क्षेत्रफळाचे अतिक्रमण केले आहे असे दिसून आल्याने दुरूस्ती अर्ज दाखल करावा लागत आहे. दुरूस्ती औपचारीक स्वरूपाचे असून मुळ दाव्यात कोणताही बदल होत नाही. तसेच मागितलेली दुरूस्ती दावा दाखल झाल्यानंतरचे घडामोडींशी संबंधित असल्याने अर्ज मंजूर करण्यात यावा असे प्रतिपादन केले.

३. याउलट प्रतिवादीचे म्हणण्यातील महत्वाचे आक्षेप पाहता दावा हा वहीवाटीस हरकत अडथळा करू नये यासाठी दाखल केलेला आहे. दाव्यात वादी स्वत:ची वहीवाट असलेबाबत कथन करत आहेत परंतू दुरूस्ती अर्जात प्रतिवादीने अतिक्रमण केले असून त्याचा कब्जा काढून मागत आहे त्यामुळे दुरूस्तीतील मागणी दाव्यातील मुळ मागणीपेक्षा अगदी भिन्न आहे. दुरूस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरूप बदलत असल्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा असे महत्वाचे मुद्‌दे उपस्थित केल्याचे दिसून येते.

४. तथापि वादीचे प्रस्तुत दुरूस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरूपात आमुलाग्र बदल होवून

दाव्याचे स्वरूप बदलत आहे काय हे पडताळून पाहण्याकरीता वादपत्रातील दुरूस्ती पूर्वीच्या मागण्या विचारात घेता प्रतिवादींनी वाद मिळकतीचे वहीवाटीस व पिके काढण्यास हरकत अडथळा करू नये अशी मागणी दाव्यात केलेली असून दाव्यात जरूर तर दावा दुरूस्तीस परवानगी असावी अशीही मागणी दिसून येत आहे. दाखल मोजणी अहवाल पाहता तो दिनांक १६/८/२०१० रोजी प्रस्तुत दाव्यात दाखल झालेला आहे. सदर नकाशा हा अतिक्रमणाशी संबंधित असून वादीची दुरूस्ती ही त्या अनुशंगाने दिसून येते. दाव्यात गट नं. २०६ चे संपूर्ण क्षेत्र वाद मिळकत म्हणून दाव्यामध्ये अंतर्भूत आहे. वादीने दुरूस्तीने केलेली मागणी ही दाव्यात मोजणी नकाशा पटलावर दाखल झाल्यानंतर केलेली दिसून येत असून ती वाद मिळकतीशी संदर्भात दिसून येते. मुळ दाव्यात कब्जासंदर्भात मागणी नाही असे दिसून येत असले तरी वादीने दाव्यात जास्तीची मागणी दुरूस्तीने समाविष्ट करून मागितली आहे. तथापि दुरूस्तीचे एकूण स्वरूप विचारात घेता ते वाद मिळकतीशी संबंधित दिसून येत असल्याने मुळ दाव्याचे स्वरूपात बदल होत आहे असे मानता येणार नाही. सबब वर चर्चिलेल्या बाबींचा विचार करता दुरूस्तीमुळे उभयपक्षातील वादाचे एकाच दाव्यात न्यायनिर्णय होण्याकरीता व पुढील गुंतागुंत टाळण्याकरीता दुरूस्ती परवानगी देणे न्यायोचित वाटत असल्याने मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. वादीचा दुरूस्ती अर्ज रू.१००/— कॉस्ट लादून मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्ज वादीने त्वरीत दुरूस्ती करून दुरूस्तीप्रत सादर करावी.

३. प्रतिवादीस दुरूस्ती भागावर ज्यादा कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

खंडाळा
दिनांक : १४/०३/२०११

रतिलाल म. कराडे
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, खंडाळा